# गीता ज्ञानदाता कोण ?







श्रीकृष्णाचा जन्म सुद्धा गीतेद्वारेच झाला. अर्थात गीता श्रीकृष्णाची माता आहे. आणि गीता ज्ञानदाता परमात्मा शिव श्रीकृष्णाचे पारलौकिक पिता आहेत.

## प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय

# गीताज्ञानदाता कोण?

## ईश्वरी संदेश

प्रिय बंधू आणि भगिनींनो,

आपले भगवद्‌गीतेवरील प्रेम, हे परमात्म्यावरील (गीतेचा भगवान) आपल्या विश्‍वासाचे, श्रद्धेचे आणि भक्तीचे सूचक आहे. परमात्मा जो सर्वांचा सद्‌गतिदाता आहे, त्याच्याकडून आपल्यालासुद्धा सद्‌गती मिळावी या सर्वोत्तम अभिलाषेनेच आपण नित्य गीतेचे पठन व पाठन करीत आहात. पण थोडा विचार करा की गीतेचे अनेकदा पारायण करूनसुद्धा मनुष्य 'नष्टो मोहः' आणि 'स्मृतिर्लब्धा' का बनू शकत नाही? गीतेचे गूढ ज्ञान यथार्थ समजले नाही म्हणूनच ते आपण आपल्या जीवनात आणू शकत नाही हेच कारण सर्व विद्वान, आचार्य, पंडित सांगत आले आहेत आणि स्वतःसुद्धा असेच समजत आले आहेत. परंतु सत्यता अशी आहे की, गीतेतील भगवंताच्या महावाक्यानुसार त्याच्याशी योगयुक्त म्हणजे "मन्मना भव" किंवा "माम् एकम्" होण्याकरिता भगवंताचा परिचय असावयास पाहिजे. परमात्मा जो आहे आणि जसा आहे त्याचा सत्य परिचय तो स्वतःच देऊ शकतो आणि गीताज्ञान सांगताना तो परिचय आता देत आहे. भगवद्‌गीता "भगवानुवाच" आहे आणि परमात्म्याचे "श्रीमत" (ईश्वरी मत) त्यात आहे. स्वयं परमात्माच गीतेचा एकमात्र खरा ज्ञाता (Authority) आणि गीताज्ञानदाता आहे. स्वयम् अवतरित होऊन भगवंताने गीताज्ञान सांगितल्यामुळे प्रत्येक कल्पात मनुष्यमात्राची गती आणि सद्‌गती होते. मनुष्यांनी लिहिलेल्या आणि ऐकविलेल्या गीतेने जर मनुष्याची सद्‌गती होऊ शकली असती तर "जेव्हा अतिधर्मग्लानी होते, तेव्हा साधुसंतांचा आणि माझ्या भक्तांचा मला येऊन उद्धार करावा लागतो" हे महावाक्य भगवंताला उच्चारण करण्याची आवश्यकताच पडली नसती. "जप, तप, दान, पुण्य आदी करून किंवा वेदशास्त्रे वाचून माझी प्राप्ती होत नाही" हे सुद्धा भगवंताचेच महावाक्य आहे. भगवंताच्या भक्तजनांनी

भगवंताची प्राप्ती करण्याकरिता या भक्तिमार्गाच्या साधनांचा अवलंब केलेला पाहूनच हे महावाक्य भगवंतानी उच्चारण केले असावे. मनुष्यकृत गीतासुद्धा फक्त परमात्म्याच्या भक्तिमार्गातील अवतरणाचीच आठवण करून देते. "भगवद्गीता" मनुष्य कसा लिहू शकतो ? प्रत्यक्षाला प्रमाण काय ?मनुष्यकृत गीता जन्म–जन्मांतर आपण भारतवासी वाचत आलो आहोत पण आपली सद्‌गती तर झालीच नाही. उलट भारतात आणखीच धर्मग्लानी झाली आहे. परमात्म्याकडून खरी गीता ऐकल्याने तर आम्ही वैकुंठवासी व्हावयास पाहिजे होते, पण आज इथे कुणी मेला तर तो स्वर्गवासी झाला असे म्हणतात. अर्थात भारतवासी इथे नरकवासी म्हणून जगत आहेत. पतितपावन सद्‌गतिदाता एक परमात्माच आहे हे माहीत असतानासुद्धा गुरू-विद्वानासहित अनेक भारतवासी रोज गीतापठन करतात आणि त्याचबरोबर पावन होण्याकरिता गंगास्नान करीत असतात, कारण गीता वाचून तर ते पावन होत नाहीत. मग प्रश्न उद्‌भवतो की पतितपावन कोण आहे ? परमात्मा (गीतेचा भगवान) की पतितपावनी पाण्याची गंगा ? साधुलोक सुद्धा तीर्थयात्रा करीत असतात. यावरून सिद्ध होते की तेसुद्धा सद्‌गतीकरिता अनेक साधना करतात, जे स्वतः सद्‌गतीकरिता भटकत आहेत ते दुसऱ्यांची सद्‌गती कशी करणार ? एक मनुष्य दुसऱ्या मनुष्याला सद्‌गतीचा मार्ग दाखवू शकतो का ? तर मग परमेश्वराला गीताज्ञान सांगण्याकरिता का यावे लागते ? सद्‌गुरू एक परमात्मा की अनेक मनुष्यात्मे ?

मनुष्यकृत गीतेत तर परमात्म्याचा परिचय नाही. गीतेवर जन्म–मरणरहित परमात्मा (निर्माता) च्या ऐवजी शरीरधारी देवता श्रीकृष्ण (निर्मित) याचे नाव टाकल्यामुळे वाचणाऱ्यांचा बुद्धियोग साहजिकच निराकार, अशरीरी परमात्म्याला सोडून शरीरधारी श्रीकृष्णाकडे जातो. एवढेच नव्हे तर परमात्म्याला सर्वव्यापी मानतात आणि श्रीकृष्णाला परमात्म्याचा अंश किंवा अवतार समजतात. परमात्मा सर्वव्यापी तर नाहीच, मग अंश असणे तर

दूरच राहिले. विचार करा की ज्याला आपण पतितपावन् सद्गतिदाता, परमपिता म्हणतो तो सर्वव्यापी होऊ शकतो का? आणि जर तो सर्वव्यापी आहे तर योग लावण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

लक्षात असू द्या की ज्ञान आणि सद्गतीचा दाता स्वयंभू परमात्माच आहे. आम्ही आपल्याला शुभ संदेश देऊ इच्छितो की, पुन्हा तोच कल्प (५००० वर्षांचा कल्प होतो) पूर्वीचा अतिधर्मग्लानीचा समय येऊन ठेपला आहे, ज्यावेळी आम्हा भक्तांची हाक ऐकून अनेक जन्मांच्या भक्तीचे फळ देण्याकरिता, अर्थात नराला श्रीनारायण आणि नारीला श्रीलक्ष्मीपदाची प्राप्ती करून देण्याकरिता, तसेच अनेक धर्म आणि धर्मभ्रष्ट राज्ये असणाऱ्या आजच्या तमोप्रधान भ्रष्टाचारी जुन्या सृष्टीचा (दुःखधाम किंवा नरकाचा) लवकरच होणाऱ्या विनाशापूर्वी या कवडीतुल्य अंतिम जन्मात येणाऱ्या अखंड, चिरस्थायी, निर्विघ्न, पवित्रता, सुख, शांती आणि संपत्तिसंपन्न सत्ययुगी आणि त्रेतायुगी दैवी स्वराज्यात यथा राजा तथा प्रजा अशा देवतापदाची प्राप्ती करवून आपल्याला अनेक जन्मांकरिता स्वर्गवासी बनवून सद्गती करण्याकरिता ज्ञानसागर, पतितपावन, सद्गतिदाता विश्वाचे एकमेव सद्गुरू, पारलौकिक परमपिता परमात्मा 'शिव' आपल्या परमधामातून (परलोक किंवा ब्रह्मलोकातून) प्रकृतीला आधीन करून, गीता–ज्ञान ऐकविण्याकरिता प्रजापिता ब्रह्मा यांच्या भाग्यशाली शरीररूपी रथात पुनः अवतरित झाले आहेत आणि गीता–ज्ञान ऐकवित आहेत. या पुस्तकात दिलेले सिद्धांत त्यांच्याकडून प्राप्त झालेल्या ज्ञानावरच आधारित आहेत.

**साक्षात परमात्म्याकडून मिळालेल्या ज्ञानाचे शास्त्र कोणते आहे?**

**गीता–ज्ञान निराकर परमात्मा शिवाने सांगितले आहे की देवता श्रीकृष्णाने?**

जगात बहुतेक प्रत्येक धर्माचे अनुयायी असे मानतात की

त्यांच्या धर्मग्रंथांत जे काही लिहिण्यात आले आहे ते सर्व ईश्वरप्रेरितच आहे. ख्रिश्चन लोक म्हणतात की परमात्म्याने येशू ख्रिस्ताद्वारे त्यांना बाईबल किंवा न्यू टेस्टामेंट (New-Testament) नावाचा ग्रंथ दिला. मुसलमान लोकांचा असा विश्वास आहे की 'ग्रॅब्रिएल' नावाच्या देवदूताने येऊन मुहम्मद पैगंबरद्वारे 'कुराण' दिले.भारतवासी मानतात की वेदाचे ज्ञान अपौरुषेय आहे आणि ते भगवंताच्या प्रेरणेनेच प्राप्त झाले आहे. बौद्ध लोक तर बुद्धालाच भगवान मानतात याप्रमाणे प्रत्येक धर्माचे लोक आपआपल्या धर्मग्रंथाला ईश्वराकडून मिळालेली अमुल्य देणगी आणि सर्वश्रेष्ठ ग्रंथ मानतात. परंतु जरा विचार करा की जर सर्व धर्मग्रंथ साक्षात परमेश्वराकडूनच उच्चारले गेले असतील आणि जर सगळे ग्रंथ परमेश्वराच्या शुद्ध प्रेरणेनेच प्राप्त झाले असतील तर मग त्यांत प्रतिपादित सिद्धांतांमध्ये जे परस्परविरोधी मतभेद आहेत ते सापडले नसते. अर्थात प्रत्येक शास्त्रात एकच ईश्वरी मत दिसले असते. कारण (God is one) परमात्मा एकच आहे आणि सत्यपण नेहमी एकच आहे. परंतु व्यक्ती तितक्या प्रकृती. आज जितकी शास्त्रे आहेत तितकीच त्यांची मते वेगवेगळी आहेत. त्यांच्या धर्मग्रंथांमध्ये सुद्धा इतका एकमेकांच्या सिद्धान्तांमध्ये मतभेद आहे की कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर एक धर्मवाला होकारार्थी देतो तर दुसरा ते नकारार्थी देतो. या सर्वांमध्ये परमपिता परमात्म्याच्या स्वरूपाविषयी वेगवेगळी मते आहेत.कोणी एक ग्रंथ परमात्म्याला विशिष्ट देशाचा निवासी मानतो तर दुसरा त्याला सर्वव्यापी मानतो, तिसरा आत्म्यालाच परमात्मा मानतो आणि चवथा सूक्ष्म देहधारी (ब्रह्मा, विष्णू, शंकर अर्थात दत्तात्रेय) आणि स्थूल देहधारी देवतांनाच परमेश्वर मानतो. तर आता असा प्रश्न उद्भवतो की ज्यांत अनेक मतभेद आहेत ते सगळे ग्रंथ एकाच परमेश्वराने दिलेले धर्मशास्त्र आहेत हे खरे आहे की परमेश्वराकडून प्राप्त झालेले वेगळे असे दुसरेच शास्त्र आहे? सर्वांहून वेगळी गीता आहे. आज सांप्रत अनेक शास्त्रांवर जर

दृष्टिक्षेप टाकला तर आपल्याला गीता कितीतरी महत्त्वाची आणि इतर शास्त्रांपेक्षा वेगळी वाटेल. आपण पाहाल की भगवद्गीते-शिवाय दुसऱ्या कोणत्याही शास्त्रामध्ये 'भगवानुवाच' शब्दाचा प्रयोग केलेला नाही की ज्यावरून हा सर्वशक्तिमान कर्ता—करविता, सृष्टीची स्थापना, महाविनाश आणि पालन करविणारा त्याचप्रमाणे मनुष्यसृष्टीचा बीजरूप परमपिता परमात्मा आहे हे सिद्ध होईल. जसे भगवंताने महावाक्य उच्चारताना स्वतःविषयी म्हटले आहे की मी ''महाकाळ किंवा सृष्टीरूपी उलटचा वृक्षाचा बीजरूप आहे (ऊर्ध्वमूलमधःशाखः), मी अव्यक्तमूर्त आहे.'' दुसऱ्या कोणत्याही शास्त्रांमध्ये बोलणाऱ्यांनी अशा प्रकारचा शब्दप्रयोग केलेला नाही. दुसऱ्या शास्त्रांमध्ये परमेश्वराची केलेली प्रार्थना, भगवंताची स्तुती, भगवंताच्या गुणांचे वर्णन केलेले आढळेल परंतु साक्षात परमेश्वराकडून प्रथम पुरूषपवाचक शब्दात दिलेले सत्यज्ञान आढळत नाही. कोणत्याही शास्त्राच्या नावावरून त्याचा भगवंताशी संबंध आहे हे पण सिद्ध होत नाही, जसे भगवद्गीता या नावावरून त्या ग्रंथाचा भगवंताशी घनिष्ठ संबंध आहे हे सिद्ध होते.

**वास्तविक गीतेचा महिमा अपार असावयास पाहिजे**

गीतेच्या भगवानाचे महावाक्य आहे की मनुष्य—आत्मा आपल्या अनेक जन्माची कहाणी जाणत नाही. परमात्मा जो ज्ञानाचा सागर (Ocean of knowledge) आणि त्रिकालदर्शी आहे तोच या सृष्टीच्या आदी, मध्य, अंताला आणि सृष्टिचक्राच्या पुनरावृत्तीच्या रहस्याला जाणतो. परमात्मा सर्वज्ञ आहे आणि विद्वान, आचार्य, पंडित इत्यादी सर्व मनुष्यात्मे त्याच्यापुढे अल्पज्ञ आहेत. ऋषी मुनींनी परमात्म्याचा आणि त्याच्यानिर्मितीचा थांग न लागल्यामुळे त्याला अनंत म्हटले आहे. ज्याप्रमाणे मोठे जलाशय (सागर) प्राप्त झाल्यानंतर नदीनाल्याकडे जाण्याची आवश्यकता भासत नाही त्याचप्रमाणे सर्वांचा सद्गतिदाता परमात्म्याच्या महावाक्यांचे 'गीताशास्त्र' असताना अन्य वेदग्रंथ, शास्त्र यांची आवश्यकता

भासली नसती आणि साऱ्या जगात गीतेलाच सर्व लोकांनी आपला एकमात्र धर्मग्रंथ मानले असते आणि मग गीतेचा महिमासुद्धा अपरंपार झाला असता.

## गीतेची मान्यता का कमी झाली ?

आपल्या देशात तर काय पण विदेशात सुद्धा गीतेला आदराचे आणि मानाचे स्थान मिळाले आहे. जगातील मुख्य भाषांतून गीतेचा अनुवाद झालेला आहे. भारतवासीयांचा गीतापठन करणे हा नित्यनियमच होऊन बसला आहे. प्रचाराकरिता आपल्या देशात अनेक गीता-पाठशाळाही उघडल्या आहेत आणि गीताजंयतीचा उत्सवसुद्धा मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात येतो. गीतेमध्ये 'भगवानुवाच' हा शब्द असल्याकारणाने वास्तविक पाहता सर्व धर्मशास्त्रांमध्ये सर्वश्रेष्ठ धर्मशास्त्र अशा तऱ्हेनेच तिची मान्यता व्हावयास पाहिजे होती परंतु जगातील सगळे मानव तिला धर्मशास्त्रशिरोमणी मानीत नाहीत, केवळ हा हिंदूंचाच धर्मग्रंथ आहे असे समजतात. आणि सगळ्यात आश्चर्याची गोष्ट ही आहे की एकजात सर्व हिंदूसुद्धा गीतेला आपले एकमेव धर्मशास्त्र मानीत नाहीत. ते तिला वेद, पुराण, भागवत, उपनिषद्, रामायण इत्यादी अनेक शास्त्रांप्रमाणे एक शास्त्र आहे असे समजतात. वास्तविक पाहता कोणत्याही धर्माचे धर्मशास्त्र हे एकच असते. त्याच्यात त्या धर्माच्या संस्थापकाच्या महावाक्यांचा संग्रह केलेला असतो. पण हिंदू लोकांना आपल्या धर्मस्थापकाची माहिती नसल्यामुळे आपल्या धर्मग्रंथाविषयी किंचितूसुद्धा माहिती नाही. याप्रकारे गीतेची मान्यता जगातील 'मुख्य धर्मग्रंथात एक, अशी आहे पण साऱ्या जगातील एकमात्र उच्चतम धर्मशास्त्र अशी नाही.

## गीतेच्या भगवंताचे नाव बदलले आहे

भगवानुवाच ज्ञानाचे जे गीताशास्त्र बनले आहे त्याला वास्तविक पाहता सर्व धर्मवाले आपला **एकमात्र** धर्मग्रंथ का मानीत नाही ही एक विचार करण्यासारखी गोष्ट आहे. याला कारण एकच

मोठी चूक आहे. ती म्हणजे गीताज्ञान-दात्याच्या (परमात्माच्या) ऐवजी श्रीकृष्णाचे नाव तीवर घातले गेले आणि भागवतात सुद्धा परमात्म्याचे चरित्र श्रीकृष्णाच्या चरित्राच्या रूपाने लिहिले गेले आहे. सर्व धर्माचे अनुयायी श्रीकृष्णाला परमात्मा किंवा परमात्म्याचा अवतार मानीत नाहीत आणि म्हणूनच गीतेला सुद्धा परमात्म्याकडून दिल्या गेलेल्या ज्ञानाचा धर्मग्रंथ मानीत नाहीत. सनातन धर्म मानणाऱ्या लोकांना सोडून बाकी सगळे हिंदू श्रीकृष्णाला एक महान पुरुष, दैवी गुणांचा मनुष्य किंवा देवता मानतात, परमात्मा मानीत नाहीत. म्हणून गीतेला 'श्रीकृष्ण उवाच' समजल्यामुळे वास्तविक गीतेला जितका उच्च मान मिळावयास पाहिजे तितका मिळत नाही आणि याच कारणामुळे गीतेच्या भगवंताची-परमात्म्याची अवतारभूमी-पुण्यभूमी-सर्व विश्वातील सर्वोत्तम तीर्थ म्हणून भारताचा जो महिमा व्हावयास हवा होता तो होत नाही. तिचा मान कमी झाला. सर्वशास्त्रशिरोमणी गीतेच्या भगवंताचे नाव बदलून टाकल्याने सगळे शास्त्र खंडित झाले आहेत, कारण तिलाच जर साऱ्या विश्वातील एकमात्र धर्मशास्त्र म्हणून मान्यता मिळाली असती तर अल्पज्ञ मनुष्याने बनविलेल्या अन्य धर्मग्रंथांची आवश्यकताच भासली नसती.

## श्रीकृष्णाला सर्व मनुष्य परमात्मा का मानीत नाहीत?

श्रीकृष्ण आणि परमात्म्याच्या स्वरूप, गुण, कर्तव्य आणि महिमात जमीन-अस्मानाचा फरक असल्यामुळे सर्व मनुष्य श्रीकृष्णालाच परमात्म्याचा अवतार किंवा गीतेचा भगवान मानीत नाहीत.

## श्रीकृष्ण निराकार (अशरीरी) नव्हता

परमात्मा (Supreme Soul) निराकार अर्थात अशरीरी किंवा अव्यक्तमूर्त आहे असे सर्व धर्माचे अनुयायी मानतात. परमात्म्याचे ना मनुष्याप्रमाणे कोणी साकार शरीर आहे ना आकारी देवता ब्रह्मा, विष्णू, शंकराप्रमाणे सूक्ष्म (Subtle) रूप आहे. आजसुद्धा आपल्याला श्रीकृष्णाची मूर्ति आणि चित्रे पाहावयास मिळतात, यावरून श्रीकृष्ण

साकारी होता आणि हे नाव त्याच्या शारीरिक रूपाचे होते हे सिद्ध होते. निराकार परमात्म्याला शारीरिक रूपही नाही आणि शारीरिक नावही नाही. तेव्हा, श्रीकृष्णाच्या नावारूपाला परमात्म्याचे नावरूप समजून स्मरण केले तर ते परमात्म्याचेच स्मरण केले असे म्हणता येईल का?

## श्रीकृष्ण अजन्मा किंवा अकालमूर्त नव्हता

परमात्मा मनुष्यसृष्टीरूपी नाटकाचा (Drama) निर्माता आणि दिग्दर्शक (Creator & Director) आहे आणि सर्व मनुष्यात्मे या नाटकात नट (Actors) आहेत. म्हणून परमात्मा अनादीपासून सर्वदा जन्ममरणातून मुक्त आहे आणि सर्व मनुष्यात्म्यांना आपापल्या भूमिका वठविण्याकरिता शरीर धारण करून जन्म-मरणाच्या चक्रात यावे लागते. ज्याअर्थी श्रीकृष्णाने शरीर धारण केले होते म्हणजेच तो जन्ममरणाच्या चक्रामध्ये आला त्याअर्थी त्याला अजन्मा, अयोनीज किंवा अकालमूर्त म्हणू शकत नाही. परंतु परमात्मा, अजन्मा असल्यामुळे त्याचे निराकार (ज्योतिस्वरूप) स्वरूप अपरिवर्तनशील आहे. श्रीकृष्णाच्या साकार नश्वर रूपाविषयी तर असेच म्हणता येईल की तो होऊन गेला आहे. म्हणून सुद्धा श्रीकृष्णाला परमात्म्याचे स्वरूप म्हणता येणार नाही.

जगातील शरीरधारी आत्म्यांना साकारी म्हणण्यात येते. आत्मा स्वतः अतिसूक्ष्म ज्योतिबिंदू असल्यामुळे निराकारच आहे परंतु शरीराचा आकार धारण केल्यामुळे त्याला साकार (जीवात्मा) म्हणण्यात येते. आत्म्याने केलेल्या कर्माच्या आधारावरच त्याला सुंदर, कुरूप, निरोगी किंवा रोगी शरीर मिळते आणि या शरीरानेच बाल, युवा आणि वृद्धावस्था त्याचप्रमाणे थंडी, गर्मी, दुःख आणि सुख वगैरे गोष्टींचा तो अनुभव करतो. परमात्मा अभोक्ता आहे, त्याला काही कर्मभोग नाही. तो कर्मातीत आहे कारण त्याला कर्म करण्याकरिता स्वतःचे शरीर नाही. म्हणून शरीर, शारीरिक भोग आणि शारीरिक आकार असल्याकारणाने कोणत्याही साकारी

मनुष्यात्म्याला किंवा आकारी देवतेला परमात्मा म्हणता येणार नाही.

शरीर सिद्ध करते की त्याला कोणी निर्माण करणारे मातापिता आहेत आणि जर परमात्म्याला शरीर असते तर त्याचे पण कोणी निर्माते असते असे मानावे लागेल, पण परमात्माच स्वयं सर्वांचा माता-पिता आहे. तेव्हा त्याला कोणी माता-पिता नाही, तो स्वयंभू आहे. यावरून सिद्ध होते की परमात्म्याचे कोणतेही स्थूल शरीर तर नाहीच पण सूक्ष्म, आकारी, प्रकाशमय, दिव्य, शरीरसुद्धा नाही. परमात्मा प्रकृतीच्या आधीन नाही. 'निराकार' शब्दाचा सुद्धा लोकांनी गैर अर्थ केला आहे की त्याला काही आकारच नाही. परंतु वास्तविक असे मानणेसुद्धा चूकच आहे. निराकारचा सत्य अर्थ वर दिल्याप्रमाणे आहे हे सिद्ध करण्याकरिता एक उदाहरण घेऊ. परमात्म्याला बरेच लोक निर्गुण पण मानतात. परंतु निर्गुणाचा अर्थ असा नव्हे की त्यात काहीच गुण नाहीत. त्याचा अर्थ असा आहे की परमात्म्याला इतर आत्म्यांप्रमाणे अल्पज्ञता, असमर्थता वगैरे गुण नाहीत तर सर्वज्ञता, समर्थता वगैरे गुण आहेत; त्याचप्रमाणे निराकार शब्दाचा भावार्थ असा नाही की त्याला काही रूपच नाही परंतु याचा अर्थ असाच आहे की त्याला कसले शारीरिक किंवा प्रकृतिकृत परिवर्तनशील रूप नाही. म्हणून त्याला निराकार किंवा अशरीरी म्हणतात. इंग्रजी भाषेत सुद्धा इनकॉर्पोरियल (Incorporeal) शब्द निराकार शब्दाचा सूचक आहे. श्रीकृष्णाला तर अतिसुंदर मोरमुकुटधारी मनमोहक आकर्षक स्वरूप आहे. अशा शरीरधारी आत्म्याला निराकार परमात्मा मानणे ही केवढी मोठी चूक आहे!

निराकार परमात्म्याचे नाव, स्वरूप, धाम, गीता-ज्ञान देण्याची वेळ आणि अवतरणाच्या विधीचा वास्तविक परिचय मनुष्यकृत गीतेंत उपलब्ध नाही.

**श्रीकृष्णाने अवतार नव्हे, पण लौकिक जन्म घेतला होता**

गीताशास्त्रातील 'भगवानुवाच' हा शब्द याची सत्यता सिद्ध

करतो की परमात्म्याला गीता-ज्ञान सांगण्याकरिता साकार शरीराचा आधार घ्यावा लागतो. कारण जेव्हा परमात्मा मुखाने ज्ञान ऐकवील तेव्हा कानाने ऐकून मनुष्यात्मा ज्ञानाला जीवनात धारण करू शकेल. मग प्रश्न उद्‌भवतो की जर परमात्मा लौकिक साकार शरीराचा आधार घेतो तर त्याला अजन्मा कसे म्हणता येईल ? म्हणूनच गीतेमध्ये भगवंताने सांगितले की "मी, परमात्मा साधारण मनुष्याप्रमाणे मातेच्या योनीतून जन्म घेत नाही (अयोनीज), माझा जन्म दिव्य आणि अलौकिक आहे. मी प्रकृतीचा म्हणजेच शरीराचा आधार घेऊन अवतरित होतो." या महावाक्यांवरून स्पष्ट होते की परमात्मा लौकिक जन्म नव्हे, पण अवतार घेतो. जर परमात्म्याने स्वतःच्या लौकिक शरीराला धारण केले असते तर त्याला जन्ममरणरहित किंवा अजन्मा म्हणता आले नसते; शिवाय, परमात्म्याने साधारण मनुष्याप्रमाणे जन्म घेतला असता तर त्याला लौकिक माता-पिता सुद्धा असते. पण परमात्मा तर सर्व आत्म्यांचा अविनाशी माता-पिता आहे. मग त्याला मानवी माता-पिता कसे असू शकतील ? याच कारणामुळे परमात्म्याला 'स्वयम्भू' सुद्धा म्हणतात. याशिवाय जर परमात्म्याने लौकिक जन्म घेतला असता तर शिशू, बाल, किशोर अवस्थांत त्याला आपल्या मात-पित्यांकडून पालन करून घ्यावे लागले असते. त्यामुळे तो कर्मभोगाच्या बंधनात बांधला गेला असता आणि प्रकृतीच्या पण आधीन झाला असता. परमात्मा कर्मबंधनापासून मुक्त असल्यामुळे प्रकृतीला आधीन करून अवतरित होतो; याकरिता पर-कायाप्रवेश करतो म्हणजे एका मनुष्यात्म्याने पहिल्यापासूनच धारण केलेल्या शरीरात प्रवेश करून त्याच्या मुखाने गीता-ज्ञानाची मुरली वाजवितो. यालाच परमात्म्याचा दिव्य आणि अलौकिक (असाधारण) जन्म, अवतार, प्रकृती, (शरीर) चा आधार घेणे किंवा "अर्जुनाच्या शरीररूपी रथावर" आरूढ होणे म्हणतात. ज्याप्रमाणे एखाद्या माणसाच्या शरीरात दुसरा मनुष्यात्मा प्रवेश करतो त्याचप्रमाणे गीतेच्या भगवानाचा आत्मा

(परम) सुद्धा एक व्यक्तिविशेषाच्या शरीररूपी रथावर आरूढ होतो. परमात्म्याचा प्रवेश झाल्यानंतर त्या शरीरात दोन आत्मे राहतात - एक त्या माणसाचा व दुसरा गीतेच्या भगवानाचा. याप्रकारे खाणे-पिणे, कर्मभोगाचा हिशेब वगैरे त्या मनुष्यात्म्याचाच चालतो आणि परमात्मा गीता-ज्ञान देण्याकरिता धर्मस्थापनेचे अलौकिक कर्तव्य संपूर्ण होईतोवर परमधामातून (परलोकातून) त्याच्या शरीरात येऊनजाऊन असतो. स्वयं गीतेतील भगवानाच्या महावाक्यानुसार अजन्मा परमात्म्याचे प्रकृतीला आधीन करून अलौकिक रीतीने अवतरित होणे आणि साधारण मनुष्यांनी जन्म घेणे याच्यातील फरकावरून सिद्ध होते की श्रीकृष्ण परमात्म्याचा अवतार अथवा गीतेचा भगवान असू शकत नाही. कारण त्याच्या आत्म्याने मातेच्या गर्भातून जन्म घेऊन आपल्या साकार शरीराला धारण केले होते.

## श्रीकृष्ण गुप्त आणि साधारण नव्हते

गीतेच्या भगवानाचे महावाक्य आहे की ''मी परमात्मा साधारण शरीरात अवतरित होऊन गुप्त असल्याने मला एखादा विरळाच ओळखू शकतो आणि बुद्धिहीन, मूढमती, अज्ञानी लोक मला ओळखू शकत नाहीत आणि एक साधारण माणूस समजून तुच्छ लेखतात.''सोळा कलासंपूर्ण श्रीकृष्णाचे रूप तर शोभिवंत, मनमोहक आणि अतिआकर्षक होते. त्याच्या जड मूर्तीमध्ये किंवा चित्रामध्ये सुद्धा इतके आकर्षण आहे तर तो चैतन्यामध्ये असताना त्याला गुप्त कसे म्हणता येईल ? आजसुद्धा जर श्रीकृष्ण चैतन्यरूपात आला तर या जगात कदाचितच कोणी सापडेल जो त्याला ओळखू शकणार नाही. यावरून स्पष्ट आहे की परमात्मा गीताज्ञान ऐकविण्याकरिता श्रीकृष्णाच्या मोहिनीरूपात नव्हे तर एका साधारण शरीरात आला होता.

विचार करण्यासारखी गोष्ट आहे की जर सर्व आत्मे आपल्या (निराकार) गुप्त अवस्थेपासून शरीर धारण करून प्रत्यक्ष (साकार)

अवस्थेत येतात तर गीतेचा भगवान साकार रूप धारण करून सुद्धा गुप्त का राहिला ? याचे वास्तविक कारण त्याच्या अवतरणाची निराळी आणि विचित्र (अलौकिक) रीतीच आहे. अन्य सर्व आत्म्यांप्रमाणे परम-आत्मासुद्धा निराकार आणि अव्यक्त आहे म्हणजे व्यक्त (शारीरिक) नेत्रांपासून अदृश्य आहे. जेव्हा कोणताही मनुष्यात्मा शरीर घेतो किंवा मृत्यूनंतर शरीर सोडतो तेव्हासुद्धा आत्म्याचे येणे-जाणे शारीरिक डोळ्यांना दिसत नाही पण आत्मा शरीरात आहे किंवा नाही याची ओळख शरीराच्या जड किंवा चैतन्य अवस्थेवरून होते. वर स्पष्टच केले आहे की परमात्मा एका अन्य मनुष्यात्म्याने धारण केलेल्या शरीरात प्रवेश करतो. निराकार परमात्म्याचे या प्रकारचे अवतरण (येणे-जाणे) या स्थूल नेत्रांनी दिसत नाही. कारण ज्या आत्म्याचे ते शरीर असते तो त्या शरीरात पहिल्यापासूनच असल्यामुळे शरीराची अवस्था चैतन्यच असते. या प्रकारे परमात्म्याचे त्या शरीरात येणे-जाणे माहिती नसल्यामुळे फार थोडे लोकच (बोटावर मोजण्याइतके पांडव) त्याला ओळखू शकतात आणि बाकी सर्व अक्षयोनी, देहाभिमानी मनुष्यात्मे त्याला तोच साधारण मनुष्य समजतात. परमात्म्याला एकतर स्वयं त्याच्यापासून मिळणाऱ्या गीताज्ञानाने, बुद्धीने (ज्ञान-नेत्राने) समजून आणि ओळखून घेणे शक्य होते; दुसरे, गीतेत भगवंतांनी सांगितल्याप्रमाणे परमात्म्याच्या वास्तविक स्वरूपाचा साक्षात्कार स्वयं त्याने दिलेल्या दिव्य दृष्टीनेच (ध्यानावस्थेमध्ये) होऊ शकतो. तसेच गीताज्ञान ऐकविण्याकरिता परमात्माच अति धर्मग्लानीच्या वेळेला अवतरित होतो. आजच्या तमःप्रधान काळात ही सृष्टी जुनी-पुराणी आणि पतित झाली आहे. इथे देवता तर काय पण त्यांची सावलीसुद्धा पडू शकत नाही. ज्याच्या शरीराच्या अंग-अंगाचा महिमा पवित्र कमलपुष्पाप्रमाणे (कमलनेत्र, मुख-कमल, कर-कमल इत्यादी म्हणून) आज-तागायत केला जातो, त्या दिव्य काया असणाऱ्या श्रीकृष्णाचा जन्म या सृष्टीवर कसा होऊ शकेल ? अशा समयी

श्रीकृष्णासारख्या दिव्य विभूतीचे माता-पिता, बंधू, सखा आदी बनण्यास योग्य अशी माणसे तरी कशी सापडतील ? ज्याप्रमाणे सत्त्वगुणी सृष्टीत पूज्य देवी-देवतांचे आत्मे पावन आणि दिव्य शरीरात निवास करतात त्याचप्रमाणे पतित आणि तमःप्रधान सृष्टीवर पतित मनुष्यात्मे पतित शरीरांना धारण करून राहतात. म्हणून अतिधर्मग्लानीच्या वेळेला परमात्म्याला अवतरित होण्या-करिता श्रीकृष्णासारखे सगुण सत्त्वप्रधान शरीर उपलब्धच नसते. पतितपावन परमात्म्याला पतित आणि साधारण शरीरात अवतरित होऊनच पावन सृष्टीची स्थापना करावी लागते. मग प्रश्न उद्भवतो की सर्वशक्तिमान परमात्मा, पतित आणि तमःप्रधान सृष्टीवर श्रीकृष्णासारखे दिव्य शरीर का उत्पन्न करत नाही. परंतु धर्मराज-परमात्मा प्राकृतिक नियमांचे उल्लंघन न करताच आपले कार्य पूर्ण करतो. हाच तर तो सर्वशक्तिमान असण्याचा पुरावा आहे. परमात्म्याने जर काही चमत्कार दाखविले असते तर सर्वांनीच त्याला ओळखले असते. तो गुप्त राहूच शकला नसता. जर परमात्म्याने श्रीकृष्णाच्या मोहिनीरूपात गीता ऐकविली असती तर ''गुप्तरीतीने अवतरित झालेल्या मला बुद्धिहीन लोक न ओळखता आपल्यासारखा साधारण मनुष्य समजतात'' असे महावाक्य त्याने उच्चारलेच नसते. यावरून श्रीकृष्ण गुप्तही नव्हता आणि साधारणही नव्हता हे सिद्ध होते.

### श्रीकृष्ण आणि परमात्म्याच्या महिमात महान अंतर

भक्तलोक श्रीकृष्णाचे गायन सर्वगुणसंपन्न, सोळा कलासंपूर्ण, संपूर्ण निर्विकारी, अहिंसक, मर्यादा पुरुषोत्तम देवता म्हणून करतात आणि मनुष्यसृष्टीचे बीजरूप निराकार, पारलौकिक, परमपिता परमात्मा जो त्रिमूर्ती (ब्रह्मा, विष्णू व शंकर यांचा रचयिता), त्रिनेत्री, त्रिकालदर्शी आणि त्रिलोकीनाथ आहे त्याच्या गुणांचे गायन ज्ञानसागर, आनंद आणि प्रेमाचे सागर, सुख, शांती आणि शक्तीचा सागर, पतितपावन, दुःखहर्ता, सुखकर्ता, गति-सद्गतिदाता म्हणून

केले जाते. कोणत्याही व्यक्तीचा महिमा त्याच्या कर्तव्यावर आधारित असतो. भक्त लोकांकडून श्रीकृष्ण आणि परमात्म्याचे गायन, पूजन आणि महिमा करण्याच्या रीती आणि विधींमध्ये जी भिन्नता आढळते, ती पुढे स्पष्ट करण्यात आली आहे.

**श्रीकृष्ण पावन होता, पतितपावन नव्हता**

श्रीकृष्णाचा महिमा त्याच्या स्वतःच्या पावन 'अवस्थे'वर अर्थात त्याच्या गुणांवर आधारित आहे. त्याने पतित-सृष्टीला पावन करण्याचे कर्तव्य केले होते त्याला काहीच प्रमाण मिळत नाही. गीतेचा भगवान-परमात्म्याला-जुन्या पतितसृष्टीचा विनाश आणि गीताज्ञानाने नवी पावन दैवी सृष्टीची स्थापना करणारा असल्या-मुळे-सद्गतिदाता आणि पतित-पावन म्हणतात. स्थापना, पालन आणि विनाश करण्याकरिता निराकार परमात्मा सूक्ष्म देवता ब्रह्मा, विष्णू, शंकराला निर्माण करतात म्हणून त्याला 'त्रिमूर्ती' सुद्धा म्हणतात. श्रीकृष्ण तर सूक्ष्म देवता विष्णूचे साकार रूप होते. त्याला ब्रह्मा, विष्णू, शंकराचा निर्माता किंवा त्रिमूर्ती म्हणू शकत नाही.

**श्रीकृष्णाचे गायन-पूजन देवतांप्रमाणेच होते**

चित्रात, मूर्तीत, श्रीकृष्णाला इतर साकार देवी-देवता श्रीराधा, श्रीलक्ष्मी, श्रीनारायण इत्यादींप्रमाणेच देवतांच्या रूपात दाखवितात. भक्तलोक ब्रह्मा, विष्णू, शंकर यांची पूजासुद्धा देवतायै नमः" म्हणूनच देवता रूपात करतात. श्रीकृष्णाला सुद्धा सुक्ष्म देवता विष्णूचे साकार रूप मानतात. यावरून सिद्ध होते की तो एक देवता होता. 'श्री' शब्दाचा प्रयोगसुद्धा श्रेष्ठ आणि पावन देवी-देवतां-करिताच केला जातो. परमात्मा तर 'श्री श्री' परमेश्वर (भगवान) आहे अर्थात देवतांचा सुद्धा निर्माता आहे.

**श्रीकृष्ण निर्माता नाही पण निर्मिती होता**

'भगवानुवाच' आहे म्हणूनच गीताज्ञानाने नराला श्रीनारायण, नारीला श्रीलक्ष्मी, किंवा पुजारी आणि पतित मनुष्यांना पूज्य आणि पावन देवतापदाची प्राप्ती होते, आता विचार करा की पतितपावन

परमात्म्याने गीता-ज्ञान ऐकवून कोणत्या पावन देबी-देवतांना निर्मिले आहे? आणि ज्या देवी-देवतांचे स्मारक आजपर्यंत आहे त्यांना देव-पदाची प्राप्ती कशी आणि कुणाकडून झाली ? वास्तविक श्रीराधा, श्रीकृष्ण, श्रीलक्ष्मी, श्रीनारायण, श्रीसीता, श्रीरामासारखे पूज्य आणि पावन सत्ययुगी-त्रेतायुगी साकारी देवताच गीतेचा भगवान (निर्माता) परमात्म्याची 'पावन' निर्मिती आहेत, ज्यांनी मागील कल्पात (सृष्टिचक्रात) संगमयुगात आपल्या ८४ व्या अंतिम जन्मात परमात्म्यापासून गीताज्ञान आणि सहज राजयोग शिकून श्रेष्ठकर्म केले. त्या श्रेष्ठकर्मांचे प्रालब्ध म्हणूनच नवीन कल्पात म्हणजे सत्य आणि त्रेता युगांत त्यांना देवपद प्राप्त झाले. मनुष्यांना तर हे माहीत नाही की गीताज्ञान ऐकणाऱ्या पांडवांना कोणत्या पदाची कुठे आणि कुणाकडून प्राप्ती झाली ? ते तर हेच वाचीत आणि ऐकत आले की पांडव हिमालयावर जाऊन मृत्यू पावले आणि त्यानंतर कलियुगाची सुरुवात झाली. ते पावन देवता श्रीकृष्णालाच गीतेचा भगवान समजतात. मग सांगा, गीताज्ञानाने कोणत्या देवतांची उत्पत्ती झाली ? वास्तविक पावन देवता श्रीकृष्णाने (निर्मिती) गीतेला जन्म दिला नव्हता पण निराकार पतित-पावन परमात्म्याने (निर्मात्याने) पतित-पावनी गीता-माता द्वारा श्रीकृष्णासारख्या पावन देवतेला जन्म दिला. परमात्म्याने स्थापन केलेल्या त्या पावन देवतांच्या सृष्टीत वैकुंठात यथा राजाराणी तथा प्रजा म्हणजे सगळे पावन देवताच राहतात. तिथे (श्रीकृष्णपुरीत)कोणी पतित माणूस नसतो की ज्याला श्रीकृष्ण पावन करील. याशिवाय भगवानुवाच आहे की "मी, परमात्माच या मनुष्य सृष्टीरूपी कल्पवृक्षाचा अविनाशी बीजरूप आणि निर्माता आहे. मीच जुन्या सृष्टीचा विनाश, नवी दैवी सृष्टीची स्थापना आणि पालन करवितो." कर्ता-करविता परमात्मा स्थापना, पालन आणि विनाशाचे कार्य क्रमशः ब्रह्मा, विष्णू आणि शंकरद्वारे करवितो. श्रीकृष्णाला गीतेचा भगवान समजण्याचा तर

हाच अर्थ होतो की हे वरील तीन्ही प्रकारचे कार्य त्यांनी केले. मग ब्रह्मा, विष्णू, शंकराचे कर्तव्य काय आहे?

## श्रीकृष्ण त्रिलोकीनाथ नाही, पण वैकुंठनाथ होता

श्री राधा-कृष्ण, श्रीलक्ष्मी-नारायण, श्रीसीता-राम या देवतांची स्मारके या सृष्टीवर आजसुद्धा आहेत. यावरून निश्चितच ते भारतामध्ये होऊन गेले हे सिद्ध होते. पावन देवी-देवता याच सृष्टीवर सत्य-त्रेतायुगी सृष्टीत सूर्यवंशी-चंद्रवंशी चक्रवर्ती राज्याचे विश्वमहाराणी-महाराजा अर्थात सर्व विश्वाचे नाथ 'जगन्नाथ' होते. त्यावेळेच्या पावन सृष्टीलाच स्वर्ग किंवा वैकुंठ म्हणतात. स्वर्ग किंवा वैकुंठ वर आकाशात नाही. श्रीकृष्णाला एका शोभिवंत महाराजकुमाराच्या रूपात दाखवितात ज्यामुळे हे स्पष्ट होते की तो वैकुंठवासी देवता होता. वास्तविक श्रीकृष्ण सत्ययुगातील प्रथम महाराजकुमार होता. म्हणून पुष्कळ चित्रात त्याला एका पिंपळाच्या पानावर आंगठा चोखताना दाखवितात (अर्थात तो सृष्टीरूपी कल्पवृक्षाचे पहिले पान होता. जर मनुष्याच्या कल्पनेनुसार तो द्वापरयुगात आला असता तर त्याला नवीन वृक्षाचे पहिले पान म्हणून कसे दाखविले गेले असते ?) मनुष्यांना हेसुद्धा माहीत नाही की श्रीराधा आणि श्रीकृष्ण यांचे स्वयंवर होऊन त्यांना राज्यभिषेक झाल्यानंतर त्यांची नावे बदलल्यामुळे ते श्रीलक्ष्मी-नारायण म्हणून ओळखले जाऊ लागले. त्या वेळेपासूनच वधूवरांचे नाव बदलण्याची पद्धत आजपर्यंत भारतात रूढ झाली आहे. म्हणूनच श्रीलक्ष्मी-नारायणच्या बाल्यावस्थेचे आणि श्री राधे-कृष्णाच्या प्रौढावस्थेचे चित्र उपलब्ध नाही. याच कारणामुळे श्रीकृष्णाला सूक्ष्म देवता विष्णूचे (नारायण) साकार रूप मानतात. रोज प्रातःकाळी आपण म्हणतोच की "श्रीकृष्ण गोविंद हरे मुरारे, हे नाथ नारायण वासुदेव." यावरून सिद्ध होते की श्रीकृष्ण आणि नारायण हे दोन्ही एकच होते. श्रीकृष्ण (श्रीनारायण) जगन्नाथ किंवा वैकुंठनाथ होता पण निराकार परमात्मा तीन्ही (सारे ब्रह्मांड) लोंकाचा स्वामी आहे. श्रीकृष्णाने

(श्रीनारायणाने) चिरस्थायी, अखंड, निर्विघ्न, सुखमय स्वराज्य भोगले पण निराकार अभोक्ता परमात्मा कधीही राज्याचा उपभोग घेत नाही.

### श्रीकृष्णाचा महिमा अपरंपार नाही

सागरातील अथांग पाण्याप्रमाणे परमात्म्याचा महिमा अपरंपार आहे आणि म्हणून त्याला ज्ञान, प्रेम, शांती, शक्ती आदी गुणांचा 'सागर' म्हणतात. परमात्म्याला 'ज्ञानसूर्य' सुद्धा म्हणतात. म्हणूनच सृष्टीच्या आरंभी गीताज्ञान, सूर्याने (परमात्म्याने) दिले असे मानले जाते. याच्या तुलनेमध्ये मनुष्यात्म्यांनी परमात्म्यापासून गीताज्ञानाने दिव्य गुण धारण करून आपआपल्या पुरुषार्थानुसार पुढच्या जन्मात प्राप्त केलेल्या देवतापदाच्या संपूर्ण अवस्थेला चंद्रमाच्या कलेची उपमा दिली जाते. श्रीकृष्णाच्या आत्म्याने सर्वोत्तम पुरुषार्थ करून उच्चतम सोळा कला संपूर्ण जीवन्मुक्त देवतापदाची प्राप्ती केली होती. दुसरे देवीदेवता त्याच्यापेक्षा कमी कलांचे होते. फक्त कलांचे अंतर सोडले तर श्रीकृष्णासारखीच चौदा कला संपूर्ण श्रीराम आणि अन्य साकारी देवी-देवतांचा सुद्धा महिमा केला जातो. सर्वात अधिक कला प्राप्त करणारा श्रीकृष्ण साकारी देवतांमध्ये उच्चतम तर होताच (ज्या कारणामुळे तो सत्ययुगाचा पहिला महाराजकुमार बनला) पण त्याच्या संपूर्ण अवस्थेला सुद्धा एक मर्यादा (सीमा) होती. तो सोळाकलासंपूर्ण देवता होता. त्याचा महिमा परमात्म्याप्रमाणे "ज्ञानसूर्य" किंवा गुणांचा सागर या रूपात होत नाही.

### श्रीकृष्ण (चौ-यांशीच्या फे-यात) पुनर्जन्मात येतो

देवतांच्या गुणांची तुलना चंद्राच्या कलांशी केली जाते. कारण ज्याप्रमाणे चंद्राची कला कमी आणि जास्त होते त्याचप्रमाणे या सृष्टिचक्रात देवता पुनर्जन्म घेता घेता आपल्या सुरुवातीच्या पावन अवस्थेपासून ढळत ढळत खालच्या कलेत येतात आणि त्यांचे पुण्य क्षीण झाल्यानंतर वाममार्गाला जातात. सृष्टिचक्राच्या अंती तर ते

पूर्णतः जीवनबंध अवस्थेला जाऊन पोहचतात. तेव्हाच या अशा जुन्या-पुराण्या झालेल्या सृष्टीवर आपल्या अंतिम जन्मात परमात्म्याकडून पुन्हा गीताज्ञान मिळाल्यावर ते येणा-या नवीन कल्पात जन्मास येऊन जीवन्मुक्त देवतापदाची प्राप्ती करतात. यावरून सिद्ध होते की देवता पावन आणि देवताच पतित अवस्थेत पुनर्जन्मात येतात. विश्वाचा पहिला महाराजकुमार श्रीकृष्ण तर सत्ययुगाच्या आदीपासून कलियुगाच्या शेवटापर्यंत पूर्ण चौ-यांशी जन्मांच्या फे-यात येतो पण निराकार परमात्मा तर जन्ममरणरहित आहे. तो ''चढत्या आणि उतरत्या'' कलेत किंवा पुनर्जन्मात येत नाही.

## श्रीकृष्णाने नव्हे, पण निराकार शिव परमात्म्याने गीताज्ञान दिले होते

वर स्पष्ट केले आहे की श्रीकृष्ण परमात्मा (गीतेचा भगवान) नाही पण एक देवता होता. परंतु सर्व लोक हेच वाचत, ऐकत आणि मानत आले आहेत की गीतेच्या भगवानाने महाभारताची हिंसक लढाई घडविली आणि त्या वेळेला एका रथात (Chariot) बसून त्याने युद्धक्षेत्रावर (कुरुक्षेत्रावर) एकट्या अर्जुनाला गीताज्ञान ऐकविले. श्रीकृष्णाच्या हातात शिरच्छेद करणारे एक स्वदर्शनचक्रसुद्धा दाखवितात. वास्तविक गीतेच्या भगवानाने काही हिंसक लढाई करविली नाही पण मायेशी (विकारांशी) युद्ध करविले. स्वदर्शनचक्राचा अर्थ आहे की परमात्म्याने मनुष्यात्म्यांना या सृष्टिचक्रात ''स्व'' (SELF) चे दर्शन करविले होते म्हणजे गीताज्ञान ऐकविले होते. गीताज्ञान ऐकविण्याकरिता परमात्मा या साकार मनुष्यसृष्टीरूपी कर्मक्षेत्रावर अवतरित होतो. पण या कर्मक्षेत्राला कुरुक्षेत्र म्हणजेच एक हिंसक युद्धस्थळ समजण्यात येते. वडाची साल पिंपळाला लावण्याचाच हा प्रकार झाला म्हणायचा! खरोखर विचार करण्यासारखी गोष्ट आहे की एका अर्जुनाला ज्ञान ऐकवून त्याचीच सद्गती करण्याकरिता का परमात्मा या सृष्टीवर अवतरित झाला

होता ? आणि रणांगणामध्ये रथावर बसून का कधी कुणला ज्ञान दिले जाऊ शकते ? याशिवाय काही लोकांची अशीही समजूत आहे की गीताज्ञान द्वापरयुगाच्या शेवटी दिले होते. पण द्वापरयुगाच्या नंतर तर कलियुग येते. तर मग परमात्म्याने गीताज्ञान ऐकवून कलियुगाची स्थापना केली का ? वास्तविक निराकार परमात्मा शिवाने आदिदेव प्रजापिता ब्रह्माच्या शरीररूपी 'रथा' मध्ये कलियुगाच्या शेवटी अवतरित होऊन गीताज्ञान ऐकविले होते आणि सत्य-त्रेतायुगी दैवी सृष्टीची स्थापना केली होती. यावरील एक कथासुद्धा प्रसिद्ध आहे. भगीरथाने तप करून शिवाकडून गंगेला खाली आणले. वास्तविक ह्या कथेचा स्थूल पाण्याच्या गंगेशी संबंध नाही. सागरापासून मेघ उत्पन्न होतात आणि मेघांच्या वर्षावापासून नदी उत्पन्न होते, पण या कथेचा वास्तविक संबंध गीता-ज्ञानामृताच्या खऱ्या खऱ्या पतित-पावनी ज्ञान-गंगेशी आहे. तो असा की, शिव परमात्म्याने ब्रह्माच्या भाग्यशाली शरीररूपी रथात येऊन गीताज्ञान दिले होते आणि मनुष्यात्मे हे ज्ञान-स्नान करूनच पावन झाले होते आणि म्हणून तिला पतित-पावनी ज्ञानगंगा म्हणतात. या गोष्टीचे वास्तविक रहस्य त्याचप्रमाणे गीताज्ञान-दाता "भगवान शिव" परमात्म्याला न जाणल्यामुळे भक्तलोक स्थूल गंगेलाच पतित-पावनी समजून तिच्यात शारीरिक स्नान करीत असतात. पण त्यामुळे ते काही पावन होत नाहीत. आता इथे गीतेचा भगवान निराकार परमात्मा शिवाचे स्वरूप, धाम आणि गीताज्ञान देण्याची वेळ इत्यादींविषयीची माहिती पाहू या.

## भारतात गीतेचा भगवान शिवाचे स्मारक

भारतात काश्मीर (अमरनाथ) पासून कन्याकुमारी (रामेश्वर) पर्यंत ज्योतिर्लिंग किंवा शिवलिंगाची अनेक मंदिरे आहेत. त्यापैकी सोमनाथ व विश्वेश्वराची मंदिरे प्रसिद्ध आहेत. ज्याप्रमाणे परमात्मा निराकार अर्थात अशरीरी आहे म्हणजे त्याचे कोणी साकार किंवा आकारी स्वरूप नाही त्याचप्रमाणे शिवलिंगसुद्धा अशरीरी आहे. या

प्रतिमेची साकारी देवी-देवता श्रीराधे-कृष्ण इत्यादींप्रमाणे काही व्यक्त किंवा स्थूल स्वरूप नाही आणि सूक्ष्म देवता ब्रह्मा, विष्णू व शंकराप्रमाणे आकारी रूपही नाही. प्राचीन काळात सोमनाथ येथील प्रसिद्ध मंदिरात शिवलिंग हिऱ्यांनी मढविले होते (ते नंतर महमूद गजनवीने लुटून नेले). हिऱ्यांनी सदैव चमकणारे ज्योतिर्लिंग परमात्म्याच्या ज्योतिस्वरूपाची (Self Luminous Form) साक्ष देत होते. तो शिव त्रिमुर्ती (ब्रह्मा, विष्णू शंकराचा निर्माता), त्रिनेत्री, त्रिकालदर्शी आणि त्रिलोकीनाथ आहे. म्हणूनच शिवलिंगावर त्रिपुंड लावण्याची सुद्धा पद्धत आहे. यावरूनसुद्धा हे सिद्ध होते की शिवलिंग परमात्म्याच्या निराकार स्वरूपाची मूर्ती आहे. म्हणून असे म्हणतात की गोपेश्वर येथे श्रीकृष्ण आणि रामेश्वर येथे श्रीराम या देवतांनी शिवलिंगाची पूजा केली होती. पण शिवाची इतकी सगळी स्मारके असताना आणि दरवर्षी त्रिमूर्ती शिवजयंती किंवा शिवरात्रीचा उत्सव साजरा करत असतानाही तोच शिव परमात्मा आणि गीतेचा भगवान आहे हे भारतवासीयांना माहीत नाही. पावन व्यक्तीचीच नेहमी पूजा केली जाते. शिवलिंग, ज्याची पूजा लाखो लोक रोज करतात तोही निश्चितच कोणत्या तरी पूजनीय व्यक्तीची प्रतिमा असली पाहिजे. पण याविषयी अनेक दंतकथा (Cock and Bull Stories) प्रचलित आहेत. वेगवेगळ्या समजुतींमुळे मनुष्य 'शिव' परमात्म्यापासून विमुख झाले आहेत.

## गीतेचा भगवान 'शिव' निराकार, ज्योति–स्वरूप आहे

परमात्म्याला निराकार म्हणण्याचा अर्थ असा नव्हे की त्याला काही रूप नाही. निराकार शब्द साकार व आकार या शब्दांशी तुलना करण्याच्या हेतूने म्हटला जातो. त्याचा अर्थ असा की मनुष्य किंवा देवता याप्रमाणे परमात्म्याचे स्थूल किंवा सूक्ष्म शारीरिक रूप नाही. 'परमात्मा रूपापासून वेगळा नाही' तर त्याचे 'रूप वेगळे आहे'. त्याचे रूप अतिसूक्ष्म, अशरीरी, बीजरूप, अव्यक्तमूर्त आणि ज्योतिःस्वरूप आहे. म्हणूनच त्याला निराकार म्हणतात. स्वरूपा-

शिवाय कुणाचेही अस्तित्व अशक्य आहे. गुणांना रूप नाही पण गुणीला (ज्याच्यात गुण आहेत) स्वरूप असलेच पाहिजे. परमात्मा ज्याला आपण ज्ञान, प्रेम, शक्ती इत्यादी गुणांचा सागर म्हणतो त्याचे स्वरूप असणे आवश्यक आहे. शिवलिंगाची प्रतिमा परमात्मा निराकार आहे हे सिद्ध करते. अन्य धर्मांचेअनुयायीसुद्धा परमात्म्याला निराकार ज्योती मानतात. मुसलमानांच्या मक्का तीर्थक्षेत्रामध्ये शिवलिंगासारख्या प्रतिमेला (संग-ए अश्वद) पवित्र (मुकद्दस) मानतात. जपानमध्ये सुद्धा अशाच प्रकारच्या आकृतीत ध्यान लावतात. ख्राइस्ट, गुरु नानक इत्यादींनी सुद्धा परमात्म्याला निराकार आणि ज्योतिस्वरूपच म्हटले आहे. पण गीतेवर श्रीकृष्णाचे नाव घातल्यामुळे ज्या गीताज्ञानाने मनुष्य सद्‌गतीला प्राप्त करू शकतो ते गीताज्ञान देणारा भगवान निराकार परमात्मा शिव आहे हे कोणीही जाणत नाही. शरीराच्या तुलनेत आत्मा निराकारच आहे. आत्म्यांना आपआपलेआत्मस्वरूप आहे. शिवलिंगाच्या सभोवती जी अनेक लहान लिंगे ठेवण्यात येतात व ज्यांना शालिग्राम म्हणतात ती आम्हा आत्म्यांचीच प्रतीके आहेत. परमात्मा एक असल्यामुळे एकच शिवलिंग आणि आत्मे अनेक असल्यामुळे अनेक शालिग्राम दाखविले जातात.

### गीतेच्या भगवानाचे नाव 'शिव' आहे

ज्याला अस्तित्व आणि स्वरूप आहे त्याला नाव असणे सुद्धा आवश्यक आहे, कारण नावाशिवाय कोणी कुणाला हाक पण मारू शकत नाही आणि स्मरू पण शकत नाही. परमात्म्याच्या नावाची तर फारच मोठी महती आहे. त्याला भगवान,परमेश्वर, हरी, ईश्वर इत्यादी अनेक नावांनी संबोधून त्याचा महिमा गायला जातो. पण त्याचे स्वतःचे नाव 'शिव' आहे. 'शिव' या शब्दाचा अर्थच कल्याणकारी असा आहे. शिव बिंदूला सुद्धा म्हणतात जे परमात्म्याच्या निराकार स्वरूपाचे प्रतीक आहे. दिव्यदृष्टीने परमात्म्याच्या वास्तविक दिव्य स्वरूपाचा जो साक्षात्कार झाला आहे तो सुद्धा बिंदूच्या रूपातच आहे. भक्तिमार्गात पूजा-अर्चा करण्या-

करिता बिंदूला मोठे लिंगाकार रूप दिले गेले आहे. तेच ज्योतिर्लिंग रूप शिवलिंग म्हणून प्रसिद्ध झाले. यावरून स्पष्ट होते की परमात्म्याचे नाव शिव आहे. त्रिभुवनेश्वर, विश्वेश्वर, महाकाळेश्वर, सोमनाथ इत्यादीसुद्धा त्याचीच नावे आहेत. ह्यावरून सुद्धा सिद्ध होते की परमपिता परमात्म्याचे दिव्य नाव 'शिव' आहे. याशिवाय ब्रह्मा, विष्णू, शंकराच्या देवळांत गेल्यावर 'ब्रह्मा, विष्णू, शंकर देवताभ्यः नमः' म्हणून नमस्कार केला जातो. परंतु शिवाच्या देवळात गेले असताना शिवाला "ॐ नमः शिवाय" किंवा "शिव परमात्मने नमः" या शब्दाचा प्रयोग करून नमस्कार केला जातो. यावरूनसुद्धा सिद्ध होते की परमात्म्याचे नाव शिव आहे. आत्म्यालाच परमात्मा माननारे 'शिवोऽहम् शिवोऽहम्'चा जप करीत असतात. मनुष्यात्मा परमात्मा नाही या विषयावर इथे ऊहापोह नको. कारण हा विषय वेगळा आहे. पण त्याच्या 'शिवोऽहम्' नामोच्चारावरून सिद्ध होते की परमात्म्याचे नाव शिव आहे आणि मनुष्यात्म्यांपेक्षा वेगळे आहे, शरीरधारी मनुष्यात्म्याचे नाव शरीरावर ठेवले जाते आणि शरीर बदलल्याबरोबरच नावसुद्धा बदलले जाते. परंतु अशरीरी परमात्म्याचे नाव त्याच्या सदैव एकसमान राहणाऱ्या निराकार स्वरूपाचे आहे. म्हणून परमात्म्याला 'सदाशिव' सुद्धा म्हणतात. शरीरधारी मनुष्यात्म्यांची नावे त्यांचे मातापिता किंवा गुरू ठेवतात. पण परमात्मा शिव स्वयंभू अर्थात शिव-शंभू आहे. परमात्म्याचे नाव 'शिव' आहे हेसुद्धा त्याने गीताज्ञान सांगताना स्वतःच सांगितले आहे.

## शिव आणि शंकर यांमधील फरक

महादेव शंकर हा ब्रह्मा, विष्णूसहित तीन देवतांपैकी एक आहे. त्याच्याकडून परमात्मा शिव या पतित सृष्टीचा नाश करवितो. त्रिमूर्ती परमात्मा शिव या तिन्ही सूक्ष्म देवतांचा निर्माता आहे. शंकराची पूजा "देवतायै नमः" म्हणूनच केली जाते. परंतु परमात्मा शिवाला "परमात्मने नमः" असे म्हणण्यात येते. शंकराचे आकारी

रूप आहे. पण परमात्मा शिवाची निराकार प्रतिमा-शिवलिंग आहे. यावरून सिद्ध होते की शिव आणि शंकर एक नाहीत.


### गीतेचा भगवान परमात्मा 'शिव' सर्वव्यापी नाही

मनुष्यात्मा परमात्मा शिवाच्या निराकार 'बिंदू' (जो चमकणाऱ्या चांदणीसारखा आहे) स्वरूपाला जाणत नाहीत म्हणूनच जो तो आपल्या कल्पनेनुसार परमात्म्याला मानतो. कोणी परमात्म्याला नाव आणि रूपापासून वेगळा मानतात तर कोणी श्रीकृष्ण, श्रीराम इत्यादी शरीरधारी देवतांनाच परमात्म्याचे अवतार समजून त्यांच्या शारीरिक आकृतींची (मूर्तींची) पूजा करतात. काही लोक आत्माच परमात्मा आहे असे समजून सर्व चैतन्य जीवांना परमात्म्याचे अंश मानतात. त्यांना 'जे जे मिळेल भूत' ते ते मानिजे भगवंत' हेच प्रमाणवाक्य आहे. अणुरेणूंत भगवान आहे म्हणजे जळी, स्थळी, काष्ठी, पाताळी सर्वत्र परमात्माच व्यापक आहे असे ते समजतात. वास्तविक पिता सर्वव्यापी होऊ शकत नाही. जर त्याला सर्वव्यापी मानले तर सगळे आपसात पिताच होतील. पण एक पिता परमात्म्याची सर्व मनुष्यात्मे संताने असल्याने विश्वबंधुत्वाचे नाते सिद्ध होते. परमात्म्याला सर्वव्यापी म्हणण्याचा अर्थ असा होतो की परमात्मा सुद्धा जन्म-मरण, कर्मभोग, दु:ख-सुखाच्या चक्रात येतो, परमात्माच पतित आणि विकारी बनतो आणि पापसुद्धा परमात्माच करतो. पण परमात्मा तर पतित-पावन, दु:खहर्ता, अजन्मा, आणि अभोक्ता आहे. आत्मा आणि परमात्मा चैतन्य सत्ता आहेत आणि प्रकृती (Nature) जड आहे. जर अणुरेणूत परमात्मा व्यापक असता तर सर्व ब्रह्मांडात जड वस्तू राहिलीच नसती, सगळीकडे एकच चैतन्यसत्ता असती आणि मनुष्य-आत्म्यांच्या संस्कारांमध्ये भेद राहिला नसता. जी वस्तू जिथे असते तिच्या बरोबर तिचे गुणसुद्धा असतात. जर परमात्मा सर्वव्यापक आहे असे मानले तर त्याचे ज्ञान, शांती, सुख, प्रेम आदी गुण सर्वांत आणि सदैव असायला पाहिजेत. मग कोणी पतितही झाला नसता आणि धर्म-

ग्लानीही झाली नसती, आणि परमात्म्याला गीताज्ञान ऐकविण्याचा प्रश्नच उद्भवला नसता. सर्वव्यापी परमात्मा कोणाला, कशाला आणि कोणते ज्ञान देण्याकरिता येईल ? कोणाला, कोणाच्या बरोबर योग लावायला सांगेल ? जे लोक श्रीकृष्णाला सर्वव्यापी परमात्म्याचा अंश-अवतार समजतात, त्यांनी विचार करावयास पाहिजे की सर्वव्यापीचा अंश कुठे असेल ? परमात्म्याला सर्वव्यापी समजल्याने तर निर्माता- निर्मिती, आत्मा-परमात्मा, देवता-दानव, पूज्य-पुजारी, भक्त- भगवान, मूर्ख-विद्वान, गुरू-शिष्य, मनुष्य-पशू, जड-चैतन्य हे शब्द निरर्थक ठरतात. म्हणून परमश्रेष्ठ पतित-पावन सद्गुरू परमात्म्याला कुत्र्या-मांजरात, दगडाधोंड्यात व्यापक मानणे म्हणजे त्याची ग्लानी आणि निंदा करणे आहे. म्हटलेच आहे "सद्गुरू परमात्म्याच्या निंदकाची सद्गती होत नाही."

**गीतेच्या भगवानाचे निवासस्थान ब्रह्मलोक (परलोक) आहे**

गीतेत भगवानुवाच आहे की "मी परमात्मा या सृष्टीत व्याप्त नाही आणि ही सृष्टीसुद्धा माझ्यात व्याप्त नाही. मी या सृष्टीच्या तसेच सूर्य, चंद्र आणि तारांगणांच्या सुद्धा पलीकडे असलेल्या स्वयंप्रकाशित ब्रह्मतत्त्वात निवास करतो (न तद्भासते सूर्यो न शशांको न पावकः ।यद्गत्वा न निवर्तंते तद्धाम परमं मम)." सोनेरी लाल रंग असलेले हे ब्रह्मतत्त्व तीन लोकांपैकी एक जे ब्रह्मांड त्यात असते. ज्यामुळे परमात्म्याला त्रिलोकीनाथ म्हणतात ते तीन लोक कोणते ते पाहू. एक आहे आकाशतत्त्वातील साकारी मनुष्य लोक (Corporeal World). त्यानंतर आकाशतत्त्वापलीकडील असलेला तो आकारी लोक (Subtle world) जेथे सूक्ष्माकारी देवता ब्रह्मा, विष्णू, शंकर निवास करतात, या आकारी लोकांच्याही पलीकडे आहे परमात्मा आणि इतर सर्व अशरीरी आत्म्यांचे निवासस्थान. त्यालाच ब्रह्मांड किंवा निराकारी लोक (Incorporeal Soul world) म्हणतात. तिथे सदैव परमशांती असते. त्यालाच शांतिधाम (Silence world), निर्वाण-




धाम (वाणीरहित), परमधाम, परलोक किंवा ब्रह्मलोक सुद्धा म्हणतात. जेव्हा कोणी माणूस मरतो, तेव्हा म्हणतात की तो परलोकात गेला (परमेश्वराच्या घरी गेला). यावरून सुद्धा सिद्ध होते की परमात्मा पारलौकिक परमपिता आहे. ख्रिस्ती व मुसलमान लोक मानतात की खुदा वर राहतो. म्हणून प्रार्थना करताना माणसाची दृष्टी अनायसे वर जाते आणि परमात्म्याला "पारब्रह्म परमेश्वर" म्हणून हाक मारली जाते. यावरून स्पष्ट होते की परमधाम वर आहे.

**परमात्मा द्वापरयुगात नाही पण कलियुगाच्या अंतिम समयी गीताज्ञान सांगतो**

आतापर्यंत आपण असेच ऐकत आणि वाचत आलो आहोत की गीताज्ञान द्वापरयुगाच्या शेवटी दिले होते. पण द्वापरयुगानंतर तर कलियुग येते. विचार करण्यासारखी गोष्ट आहे, की भगवंताने गीताज्ञान देऊन का हया अतिधर्मग्लानी झालेल्या कलियुगाची स्थापना केली! गीतेत भगवानुवाच आहे की "जेव्हा या सृष्टीवर अतिधर्मग्लानी होते, आणि पापांचा घडा पूर्ण भरतो तेव्हाच मी या जुन्यापुराण्या सृष्टीचा विनाश आणि नवीन दैवी सृष्टिची पुन:स्थापना

करण्याकरिता येतो." पापाचा घडा तर कलियुगाच्या शेवटीच भरतो आणि तेव्हाच मनुष्यात्मा संपूर्ण तमोप्रधान बनतो. पण भारतवासी परमात्म्याचा अवतार युगे-युगे मानतात (तरी सुद्धा चार युगात चार अवतार मानायला पाहिजे होते, २४ अवतार नाही). जर परमात्मा प्रत्येक युगात अवतरित झाला असता तर सृष्टीच्या प्रत्येक युगात आधीच्या युगापेक्षा जास्त अधःपतन झाले नसते. वास्तविक गीताज्ञान परमात्मा शिवाने कलियुगाच्या शेवटी सांगितले होते (आणि आताही सांगत आहे). सत्य, त्रेता, द्वापर, कलियुग ह्या क्रमानुसारच अनादी सृष्टिचक्राची पुनरावृत्ती होत असते. सत्ययुगाच्या आधी कलियुग असते आणि कलियुगानंतर सत्ययुग येते. ह्या सृष्टीवर कलियुगात अनेक धर्म आणि राज्ये असतात (ज्याप्रमाणे आता आहेत) आणि सत्ययुगात 'अहिंसा परमो धर्मः' विश्वमहाराणी-महाराजा श्रीलक्ष्मी-नारायणाचे चक्रवर्ती अखंड स्वराज्य असते. विचार करण्यासारखी गोष्ट आहे की कलियुगाला सत्ययुगात बदलणारा कोण आहे ? कलियुगाचा शेवट आणि सत्ययुगाची सुरुवात या दोघांच्या संगमावर (Confluence) परमात्मा शिव आदि-देव ब्रह्माच्या मुखकमलातून गीता-ज्ञान सांगून सत्ययुगी पावन दैवी सृष्टीची स्थापना करतो. यावरून सिद्ध होते की कलियुगाच्या शेवटीच परमात्मा शिवाने गीता-ज्ञान सांगितले, कारण कलियुगानंतर सत्ययुग येते. गीतेच्या भगवानाचे महावाक्य आहे की "या सृष्टीरूपी कल्पवृक्षाचे अविनाशी बीजरूप मीच असून या जुन्या वृक्षाचा विनाश आणि नवीन वृक्षाचे कलमही मीच लावतो." यावरून सिद्ध होते की परमात्मा युगेयुगे नाही पण प्रत्येक कल्पात (५००० वर्षांत) म्हणजे कलियुगाच्या अंतिम समयी एकदाच अवतरित होतो. कारण तेव्हाच सृष्टीरूपी कल्पवृक्षाची वाढ पूर्ण झालेली असते आणि तो तमःप्रधान अवस्थेला पोहोचलेला असतो. अर्थात तेव्हाच सर्व आत्मे या सृष्टीमंचावर साकार झालेले असतात, जनसंख्येची वाढ पण पूर्ण झालेली असते आणि आत्म्यांची आपल्या

(स्वधामाला) परमधामाला परत जाण्याची वेळ झालेली असते. महाशिवरात्री हा शब्द या सत्यतेची साक्ष देतो की परमात्मा शिव ब्रह्माच्या कलियुगरूपी रात्रीच्या अंतिम समयी येऊन नवीन सृष्टीची स्थापना करतो. कलियुगाचा शेवट व सत्ययुगाची सुरुवात या दोहोंच्या संगम काळाला (संधिकाळाला) एक लहानसा धार्मिक युग किंवा संगमयुग (Leap yoga) सुद्धा म्हणू शकतो.

## आदि-देव ब्रह्माची ओळख

संन्यास घेतला किंवा कोणी मुलाला दत्तक (Adoption) घेतला की त्याचे आधीचे नाव बदलून दुसरे नाव ठेवण्याची आपल्याकडे पद्धत आहे. त्या पद्धतीला अनुसरूनच निराकार परमात्मा शिव गीताज्ञान सांगण्याकरिता ज्या साधारण व्यक्तीच्या शरीररूपी रथात अवतरित होतात त्याचे लौकिक नाव बदलून ब्रह्मा असे ठेवतात. गीतेत सांगितलेला अर्जुन हा ब्रह्माच आहे. त्याच्याच शरीररूपी रथात गीतेचा भगवान अवतीर्ण होतो. ब्रह्माला 'भागीरथ' सुद्धा म्हणतात कारण हाच तो भाग्यशाली रथ (शरीर) आहे, ज्याच्यात परमपिता परमात्मा शिव अवतरित होतात आणि हेच ते गोमुख आहे ज्यातून परमात्मा शिवाने दिलेली ज्ञान-गंगा वाहते. शास्त्रामध्ये सुद्धा उल्लेख आहे की ब्रह्माने यज्ञ रचला होता, त्यातून देवी-देवतांची उत्पत्ती झाली आणि मग त्यांची वृद्धी झाली. परंतु आपल्याला हे माहीत नाही की परमपिता परमात्मा शिव साकार ब्रह्माच्या मुखातून गीताज्ञान सांगून कलियुगातील अतितमोप्रधान आसुरी संस्कार असलेल्या क्षुद्रसम्प्रदायाच्या मनुष्यात्म्यांना ब्राह्मण बनवितो आणि म्हणूनच म्हणतात की ब्राह्मण ब्रह्माच्या मुखातून उत्पन्न झाले. हेच खरे ब्रह्मामुखवंशावली ब्राह्मण नव्या सत्य-त्रेतायुगी (स्वर्ग किंवा वैकुंठ) दैवी सृष्टीत देवतापद प्राप्त करतात. ह्याच कारणामुळे मंदिरात "ब्राह्मणदेवीदेवताभ्योः नमः" असे म्हणून कौरव-वंशावली ब्राह्मणसुद्धा त्यांना नमस्कार करतात. ब्रह्माद्वारे सत्य-त्रेतायुगी दैवी प्रजेची उत्पत्ती केली जाते म्हणून

त्याला ''प्रजापिता ब्रह्मा'' सुद्धा म्हणतात. यावरून सिद्ध होते की स्थापनेचे कार्य ब्रह्माकडून या साकार सृष्टीवरच केले जाते. कारण सूक्ष्मलोकात तर ब्रह्माद्वारा प्रजेची उत्पत्ती होऊच शकत नाही. साकार ब्रह्मासुद्धा आपली संपूर्ण अवस्था प्राप्त केल्यावरच सूक्ष्म ब्रह्माप्रमाणे तेजस्वी बनतो. मनुष्य परमात्म्याप्रमाणे ब्रह्मालासुद्धा निर्माता मानतात. याशिवाय ब्रह्माला आदि-देवसुद्धा म्हणतात. यावरून सिद्ध होते की परमात्मा दैवी सृष्टीची सुरुवात (स्थापना) ब्रह्माद्वारेच करवितो.

ब्रह्माला आपआपल्या भाषेत खिस्ती लोक एडम् (Adam) आणि मुसलमान लोक 'आदम' या नावाने ओळखतात. ब्रह्माला या सृष्टीरूपी नाटकाचा मुख्य अभिनेता (Hero) सुद्धा म्हणू शकतो, कारण याची भूमिका सत्ययुगापासून कलियुगाच्या अंतापर्यंत साऱ्या कल्पभर चालते. म्हणून ब्रह्माच्या नावावरच सत्यत्रेतायुगी पहिल्या अर्ध्या कल्पाला ''ब्रह्माचा दिवस'' (सुखधाम किंवा स्वर्ग) आणि बाकीच्या अर्ध्या कल्पाला (दु:खधाम किंवा नरक) ''ब्रह्माची रात्र'' म्हणतात. चित्रामध्ये ब्रह्माला पांढरा दाढीवाला एक म्हातारा माणूस दाखविला जातो. यावरून सिद्ध होते की गीतेचा भगवान शिव एका अनुभवी मनुष्यात्म्याच्या साधारण वृद्ध शरीरात प्रवेश करतो. जर परमात्मा श्रीकृष्णासारख्या बालकाच्या शरीरामध्ये आला असता तर मोठ्या (वयस्कर) माणसांना त्याच्याबरोबर पित्याचे संबंध जोडणे किंवा त्याला 'पिता' म्हणणे सुद्धा अस्वाभाविक वाटले असते.

### खरा रुद्र गीता-ज्ञान यज्ञ

बहुतेक लोक असे समजतात की गीता-ज्ञान युद्धक्षेत्रावर दिले होते. पण वास्तविक गीतेचा भगवान शिव ज्याला रुद्रसुद्धा म्हणतात, कलियुगाच्या शेवटी गीताज्ञान देण्याकरिता आणि सहज राजयोग शिकविण्याकरिता प्रजापिता ब्रह्माकडून ईश्वरी विश्वविद्यालय (Godly university) किंवा रुद्र गीता-ज्ञान यज्ञाची स्थापना करवितो. या यज्ञातूनच विनाशज्वाला प्रज्वलित होते आणि सर्व आसुरी आणि पतित सृष्टीची आहुती त्यात पडते. या यज्ञात क्षुद्रापासून ब्राह्मण

होणारे प्रजापिता ब्रह्मा-मुखवंशावली ब्रह्माकुमार-कुमारी शिवाच्या रुद्रमाळेचे चैतन्यमणी बनतात. हे ब्रह्मामुखवंशावली ब्राह्मणच योगेश्वर परमात्म्याकडून सहज राजयोग शिकून महाराजा-नारायण आणि महाराणी-श्रीलक्ष्मीचे श्रेष्ठ पद प्राप्त करतात. सांप्रत अतिधर्मग्लानीच्या समयी गीतेचा भगवान शिव बह्माकुमारी विश्वविद्यालयाद्वारे कल्पा (५००० वर्षा) पूर्वीप्रमाणे पुन्हा गीताज्ञान ऐकवून नव्या सृष्टीच्या पुनः स्थापनेचे कार्य करीत आहे. त्याचबरोबर अॅटम आणि हायड्रोजन बॉम्ब आणि महाभारतात प्रसिद्ध असलेले मुसळ (Missiles) इत्यादी द्वारे जुन्या पतित आसुरी तमोप्रधान सृष्टीच्या विनाशाची (महाभारत) तयारी होत आहे, त्याचे पूर्व-चिन्ह सर्वांना दिसतच आहे. म्हणून आता परमात्मा शिव, जो सर्व आत्म्यांचा पिता आहे, मनुष्यात्म्यांना आज्ञा करतो की "हे वत्सांनो, हा तुम्हा सगळ्यांचा शेवटचा जन्म आहे. म्हणून तुम्ही देहासहित सर्व संबंध विसरून माझेच स्मरण करा, माझेच चिंतन करा, 'मामेकं स्मर नित्यशः' मन्मना भव. पवित्र व्हा आणि योगी व्हा. माझ्याकडून पूर्वीप्रमाणे २१ जन्मांकरिता सदा सुख, शांती आणि पवित्रता ह्यांचा वारसाहक्क प्राप्त करा. पण हे सत्य ज्ञान तुम्ही लवकरच होणाऱ्या महाभयंकर महाविनाशाच्या आधीच घेऊ शकता हे लक्षात ठेवा. आता नाही तर मग कधीच नाही."

ह्या लहानशा पुस्तकात गीता-ज्ञानासारखे गुह्य रहस्य संपूर्णपणे स्पष्ट करणे तर शक्य नाही हे तर आपण जाणताच. अधिक माहितीसाठी वाचकांनी ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्यां कोणत्याही कार्यालयात (सेवा केंद्रावर) जाऊन समक्ष भेटण्याची तसदी घ्यावी.

ॐ शांतिः

# प्रजापिता ब्रह्माकुमारीज ईश्वरीय विश्व-विद्यालय
# पांडव भवन, आबू पर्वत, राजस्थान

संपूर्ण विश्वात एकूण 8500 सेवाकेंद्रे आहेत

## महाराष्ट्रातील सेवाकेंद्रे

**मुंबई**-22 : 19,नरोत्तम निवास, किंग सर्कल स्टेशन जवळ सायन..... फोन: 24073015
**मुंबई**-56 : 'ओमशांति', स्वस्तिक सोसायटी, प्लाट नं 48,
एन.एस.3 रस्ता, जुहू योजना, विलेपार्ले..................... फोन: 26160789
**मुंबई**-7 : 23, दर-उल-मुलूक, पं.रमाबाई रोड, गांवदेवी.............. फोन: 23636585
**मुंबई**-5 : 24-25, 'गीतांजली', रेडिओ क्लबमागे, कुलाबा.......... फोन: 22830494
**मुंबई**-62 : 'आश्रय', 4 रस्ता, एम. जी. रोड,
तिवारी हॉस्पीटलजवळ, गोरेगांव (पश्चिम)............... फोन: 28741882
**मुंबई**-55 : 102, एवरेस्ट, पहिला मजला, नेहरू रोड,
पोस्ट ऑफिसजवळ, शांताक्रुज (पूर्व)..................... फोन: 26103731
**मुंबई**-77 : 23-24, शंकरछाया, 19 म. गांधी रोड, घाटकोपर (पूर्व) फोन: 25093700
**मुंबई**-80 : गालामानोर, प्लाट नं. 544 बी,
ब्लाक नं. 3,4,5 एन. एस. रोड, मुलुंड (पश्चिम).......... फोन: 25617393
**मुंबई**-92 :बी/6 गार्डन व्ह्यू अपार्टमेंट, चंदावरकर लेन, बोरीवली(प.) फोन: 28903896
**नागपूर**-22: **(मराठी साहित्य व पत्र-पाठ्यक्रम)**. 'इंद्रप्रस्थ', 8-अ, वसंत नगर, फोन:
2246793, 9373225747, 2225746, **Email : vasantnagar.ngp@bkivv.org**
**पुणे**-37 : 19/377, मिरा सोसायटी, शंकर शेट रोड............. फोन: 26450767
**पुणे**-2 :111,कावेरी अपार्टमेंट, आंबेडकर कॉलेज जवळ,क्वाटर गेट फोन: 26353327
**पुणे**-1 ; अे-12, 'शांतीकुंज' जी.पी.ओ. समोर..................... फोन: 26122525
**नासिक**-3 : 4612, ओल्ड आग्रा रोड, भागवत निवास,
पंचवटी सेवाकुंज समोर.................................... फोन: 2518484
**अमरावती**-6 : 'सुखशांती भवन', विजय कॉलनी..................... फोन: 2574397
**अकोला**-1 : टी/3 किर्तीनगर, गोरक्षण रोड, (R.T.O.) जवळ...... फोन: 2458547
**औरंगाबाद**-5 : सुख शांती भवन, 30/35 भानुदास नगर ............ फोन: 2342199
**चंद्रपूर**-2 : 'तपस्या भवन', भानापेठ, वार्ड नं. 2, कस्तुरबा रोड....... फोन: 253574
**कोल्हापूर**-2 : 2397, शिवाजी पेठ, तटाकडील तालीम गल्ली........ फोन: 2629421
**सोलापूर**-2 : 'शिवप्रकाश भवन', 15/18 अ, कारंबा रोड, सम्राट चौ. फोन: 2325671
**जळगांव**-1 : 'ओमशांती भवन', ढाके कॉलनी, ब्रह्माकुमारीज मार्ग.... फोन: 2236259
**भुसावळ**-1 : 'राजयोग भवन', यावल रोड............................ फोन: 222949
**भंडारा**-4 : 'शिव स्मृती भवन', कृष्ण मंदिर वार्ड..................... फोन: 252168
**वर्धा**-1 : गोपूरी, साठवणे ले-आऊट, पवनार नाका.................. फोन: 242323
**यवतमाळ**-1 : 'सुख शांती धाम', 74, ओम सोसायटी, अमी रोड.... फोन: 246615
**बुलढाणा**-1 : एकता नगर, पोस्ट क्वार्टर्सच्या मागे, सर्क्युलर रोड...... फोन: 242724
**लातूर**-31 : 'राजयोग भवन', ओल्ड औसा रोड, नंदी स्टॉप........... फोन: 200097

**मलकापूर**-1 : जिल्हा बुलढाणा, 40 बीघा, बंदे फ्लोर मिल जवळ..... फोन: 260386
**नांदेड**-5 : 'सुख शांती भवन', कैलाश नगर........................ फोन: 251649
**सांगली**-16 : ब्लॉक नं. 4, प्लाट नं. 5, साखर कारखाना............ फोन: 2310342
**बीड**-22 : 'दिव्य दर्शन भवन', आदर्श नगर, पांगरी रोड...............फोन: 222915
**गोंदिया**-1 : 'स्वदर्शन भवन', न्यू लक्ष्मी नगर.......................... फोन: 250264
**सातारा**-1 : कल्याणी नगर, झेड.पी.कँपच्या समोर .................... फोन: 229795
**मालेगांव**-3 : (जि. नाशिक) 'लाईट हाऊस', 310, संगमेश.......... फोन: 250495
**पणजी** (गोवा)-1 : ई-98 माळा.................................... फोन: 2226044
**पणवेल**-6 : (जि. कुलाबा) आदिती, प्लॉट नं.107,
रूम नं. 102,103, मीडल क्लास सोसायटी....... फोन: 27452618
**कल्याण**-1 : (जि. ठाणा) 'स्मृती बिल्डिंग', फर्स्ट फ्लोअर,
अहिल्याबाई चौक.......................................... फोन: 2209959
**हिंगणघाट**-1 : (जि. वर्धा) 'ज्ञान विज्ञान भवन', 148, यशवंत नगर... फोन: 245028
**गडचिरोली**-5 : 'शिवशक्ति भवन', शिवाजी वाचनालयाजवळ ....... फोन: 232442
**देगलूर**-17 : (जि. नांदेड) 'अमृतकुंड', दत्त कृपा सोसायटी-2......... फोन: 255607
**उदगीर**-17 :(जि.उस्मानाबाद) 'सद् भावना भवन', 3-2-1014/1,
ओमशांती कॉलनी......................................... फोन: 256340
**उमरेड**-3 : (जि. नागपूर) 'पावन धाम', कावरा पेठ.................. फोन: 242787
**वरूड**-6 : (जि. अमरावती) 'ज्ञानदीप भवन', गोमापूरवाडी............ फोन: 234073
**पुसद**-4 : (जि. यवतमाळ) 'आत्मदर्शन भवन', विठाबाई नगर........ फोन: 248333
**परतवाडा**-5 : (जि. अमरावती) 'शिवदर्शन भवन', मोहन नगर.........फोन: 221353

## भारतातील अन्य सेवा केंद्रे

**दिल्ली**-5 : पांडव भवन, 25 न्यू रोहतक रोड, करोल बाग............फोन: 23628976
**कोलकाटा**-20 : 1/अ, आशुतोष मुखर्जी रोड........................फोन: 24753521
**अहमदाबाद**-22 : 'सुखशांती भवन', भुलाभाई पार्क रोड, कांकरिया..फोन: 25324360
**चेन्नई**-40 : 'शांतिधाम', प्लॉट नं. 3702-96, 3रा एव्हेन्यू अन्नानगर. फोन: 26267441
**चंदीगड**-20 : 'राजयोग भवन', सेक्टर 33 अे.................... फोन: 2601339

## OVERSEAS

**LONDON**-NW 10-2 HH : Global Co-operation House, 65
Pound Lane, Ph : 44-20-8727 3350
**NEW YORK**, 10017:Brahmakumari's Office at U.N.Room
No. 436, 866 UN Plaza (Ph :1-212-688 1335)
**NAIROBI**- (Kenya) Global Museum, Maua close, Westlands,
PO Box 123-00606-Ph-254-20-3743572, 3741239
**SYDNEY** NSW 2131- 'Indraprasth' 78 Alt Street
Ashfield ....Ph : 61-2-9799 9880
**PARIS**-75020, 74 Rue Orfila, Ph : 33-1-4358 4427
**BERLIN** Crellestr,-26...Ph-49-30-7813059
**GENEVA** (Switzerland) : 12 rue. de cour 86, Ph 41-21-7223610

आत्मदर्शन, परमात्मदर्शन व विश्वदर्शन
करवून जीवनांत संपूर्ण शांती, समाधान व
मानसिक सुख मिळवून देणारे

# "ईश्वरी ज्ञान व राजयोगाचा" पत्र-पाठ्यक्रम

## प्रश्नोत्तरांच्या सोईसह सात आकर्षक पाठ

पाठ 1 - शरीर आणि आत्मा

पाठ 2 - आत्मा आणि परमात्मा

पाठ 3 - परमात्म्याचे दिव्य कर्तव्य

पाठ 4 - संन्यासमार्ग, भक्तिमार्ग आणि ज्ञानमार्ग

पाठ 5 - मनुष्य सृष्टीरूपी कल्पवृक्ष

पाठ 6 - मनुष्यात्म्याच्या 84 जन्मांची कहाणी

पाठ 7 - सहज राजयोग

**संपूर्ण पाठ्यक्रमाचे शुल्क फक्त पंचवीस रुपये (मनीआर्डरने) आपल्या पूर्ण पत्त्यासह पाठवा**

प्रकाशक- मराठी साहित्य विभाग
निर्देशिका पत्र-पाठ्यक्रम
प्रजापिता ब्रह्मा कुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय
इंद्रप्रस्थ भवन, दीक्षाभूमि चौकाजवळ,
8-अ, वसंत नगर, नागपूर-440 022
☎-2246793, 2225746, 9373225747
Email : vasantnagar.ngp@bkivv.org

# गीताज्ञान - कोणी, कसे व केव्हा दिले?

या गुह्य रहस्यमय विषयाच्या बाबतीत खालील विचार आपल्यासमोर ठेवणे अनुचित होणार नाही -

"…. ज्ञान, भक्ती, योग इत्यादी विषयांची इतकी चर्चा युद्धभूमीवर होणे कसे संभव आहे? काय युद्धक्षेत्रावर या वार्तालापाला लिपिबद्ध करणारा उपस्थित होता? कृष्णाच्या व्यक्तित्वाबद्दलही अनेक शंका आहेत. छांदोग्य उपनिषदामध्ये त्याला देवकीचा पुत्र दाखविले आहे, ज्याने धोरा नामक योग्यापासून आध्यात्मिक ज्ञान प्राप्त केले; विष्णुपुराणात त्याला गोपींच्या सोबत खेळताना दाखविले आहे, इत्यादी …. आम्ही ह्या निष्कर्षाला पोहोचतो की, महाभारताच्या युगामध्ये अन्य कोण्या दिव्य विभूतींचा प्रादुर्भाव झाला …."

**- विवेकानंद**

(अनुवाद - Selections from Vivekanand)

"…. गीता ऐतिहासिक ग्रंथ नाही, किंबहुना त्यात भौतिक युद्धाच्या वर्णनाच्या निमित्ताने, मनुष्याच्या हृदयात सदैव होत असणाऱ्या द्वंद्वयुद्धाचेच वर्णन आहे, कृष्ण म्हणजे गीतेचे मूर्तिमंत शुद्ध संपूर्ण ज्ञान आहे. परंतु काल्पनिक …."

**- गांधीजी**

(अनुवाद - अनासक्तियोग प्रस्तावना)

"…. गीतेचा काळ इ.स. पूर्व पाचव्या शताब्दी (जवळजवळ 2,500 वर्षे पूर्व) मध्ये सांगितल्या जातो. वास्तविक पाहता त्यानंतरही तिच्या मूळ पाठांमध्ये अनेक अदल-बदल झाले आहेत. आम्हाला गीतेच्या भगवंताचे नाव माहीत नाही. याचे श्रेय व्यासांना दिले जाते… असे म्हटले जाते की उपदेश देतेसमयी कृष्णाला, युद्धक्षेत्रावर अर्जुनासमोर 700 श्लोक शिकविणे संभव झाले नसावे."

**- डॉ.राधाकृष्णन**

(अनुवाद - राधाकृष्णन भगवद्गीता)

"अठरा अध्यायांच्या गीतेचे वाचन युद्धभूमीवर झालेले असावे, हा विश्वास त्याचेच मनात राहू शकतो, ज्याने केव्हाही गीतेचे पारायण केले नसेल…"

**- भदन्त आनन्द कौसल्यायन**

(अनुवाद - भगवद्गीता की बुद्धिवादी समीक्षा)